म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३१८८



RFFBK-0024828

# भीमवाणी

रा. तु. भगत

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना:**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

# भीमवाणी

( बाल व प्रौढ वाचकांसाठी अत्यंत उपयुक्त )

REFBK-0024828

रा. तु. भगत

चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.

प्रकाशक

चैतन्य प्रकाशन,
२०३२ ए, घोत्री गल्ली,
कोल्हापूर,

मुद्रक

ललित मुद्रणालय,
१७५६ ए, ताराबाई रोड,
कोल्हापूर.

प्रथमावृत्ती

१ ऑगस्ट १९८३

सर्व हक्क सुरक्षित

किंमत : आठ रुपये फक्त

शिक्षणातून समाजपरिवर्तन घडावे
यासाठी सतत धडपड करणारे
आदरणीय शशिकांत दैठणकर
यांना सादर —

3986
निबंध

## रत्न

---

**आपण मनात एक निश्चित विचार धारण करा. त्या विचाराप्रमाणे आचरण करा. आपल्या आचरणातील आर्तता देवापर्यंत जाऊन भिडेल. मग आपणास खरे रत्न मिळेल.**

---

महू येथील लष्करी छावणीतील एक गोष्ट. योगायोगाने तेथे एक बैरागी आला. तो फार वृद्ध होता. बैरागीबुवानी आपल्या घरी यावे, अशी रामजी सकपाळांनी इच्छा व्यक्त केली. सर्वसंग परित्याग केलेल्या बैराग्यास सख्या सोयऱ्यांच्या मोहपाशात अडकून पडणे योग्य वाटले नाही. म्हणून बैराग्याने सकपाळाचे घरी येण्याचे नाकारले व तेथेच त्या बैराग्याने रामजी सकपाळास आशीर्वाद दिला की, " आपल्या कर्तृत्वाने इतिहासावर चिरंतन ठसा उमटवून आपल्या घराण्याचे नाव अजरामर करील असा पुत्र तुझ्या पोटी जन्मास येईल. " या शुभाशीर्वादावर रामजी सकपाळ पति-पत्नीची श्रद्धा बसली. आपल्या अज्ञ, अपंग व विपन्न अवस्थेत शेकडो वर्षे पिचत पडलेल्या बांधवाना तारण्यासाठी हे देवा, तू आमचे घरी अवतार घे, म्हणून त्यानी मोठ्या आर्त भावनेने देवाची करूणा भाकली. शेवटी त्या करूणासागर देवाने जणू दार उघडले. अठराशे एक्याण्णवच्या चौदा एप्रिलला महू येथे तपोनिष्ठ भीमाबाईना पुत्र रत्न प्राप्त झाले. त्यानी आपल्या चौदाव्या रत्नाचे नाव भीम असे ठेवले. शेकडो वर्षे अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडत पडलेल्या स्वकीयांचा उद्धार करण्यासाठी नियतीच्या शुभाशीर्वादाने भीमाबाईच्या पोटी हे चौदावे पुत्ररत्न जन्मास आले. याच पुत्ररत्नास लोक पुढे बाबासाहेब आंबेडकर म्हणून ओळखू लागले.

**कोण स्पृश्य आणि कोण अस्पृश्य ? कोण उच्च आणि कोण नीच ? आपण सर्वजण एकाच देवाची लेकरे आहोत. म्हणून ' मानव तितुका एकच आहे. ' या गोष्टीची जाणीव बाळगली पाहिजे.**

---

उन्हाळ्याचे दिवस. रात्रीची वेळ. रस्त्यावर चिटपाखरुही दिसत नव्हते. अशावेळी बालभीम आपला भाऊ आणि भाचा यासह आपल्या वडिलांना भेटण्यासाठी कोरेगावकडे निघाले होते. ही मुले मसूरपर्यंत आगगाडीने आली. तेथून पुढे त्याना एक बैलगाडी भाड्याने मिळाली. तीन मुले गाडीत बसली. मुलांच्या बोलण्यावरुन गाडीवानाने ही मुले महाराची आहेत, हे हेरले. त्याबरोबर आपली गाडी या महारांच्या पोरानी विटाळली, असे त्यास वाटले. त्याने गाडी थांबविली. टोपलीतून कचरा जसा बाहेर फेकून देतात, त्याप्रमाणे ती मुले गाडीबाहेर फेकून दिली. मुले घाबरली, मुलानी दुप्पट भाडे देण्याचे ठरविले. गाडीवानाच्या तोंडाला पाणी सुटले. शेवटी मुलानी गाडी हाकावी व गाडीवानाने गाडीमागे पायी चालावे असे ठरले. गाडी चालू असताना मुलांचा जीव तहानेने कासावीस झाला. पाण्यासाठी धडपड सुरू झाली. पाणी मिळेना. मुले तडफडू लागली. मग कोणी घाण पाण्याचे डबके दाखवी. पाणी देण्याची विनंती केली तर कोणी पाणी देण्याचे नाकारीत. शेवटी अगदी अर्धमेल्या स्थितीत मुले मुक्कामास पोहोचली. काळीज फाडून टाकणारी ही काळ्याकुट्ट रात्रीची आठवण बाबासाहेबांच्या मनात घर करून बसली. महार जातीमुळे आपणास किती हीनदीन व केविलवाणे जीवन जगावे लागते, या गोष्टीची पहिली जाणीव बाबासाहेबाना झाली.

## संधी

---

**प्रत्येक माणसाच्या आयुष्यात जेव्हा संधीची लाट येते, तेव्हा त्या संधीचा योग्य प्रकारे उपभोग त्याने केला तर त्या मनुष्यास वैभव प्राप्त होते.**

---

१९१३ सालची गोष्ट. बाबासाहेब पुढील शिक्षणासाठी न्यूयॉर्कला पोहोचले. हिंदी मनुष्याला शिक्षणासाठी परदेशात जावयास मिळणे, ही त्याकाळी एक दुर्लभ संधी गणली जाई. बडोदा सरकारच्या कृपेमुळे बाबासाहेबांना ही परदेशातील शिक्षणाची संधी मिळाली. परदेशात सुखविलासात रमून जाण्याकडे त्यांचा कल नव्हता. ते अत्यंत साधेपणाने व काटकसरीने जीवन जगत होते. जेव्हा त्याना सपाटून भूक लागत असे, त्यावेळी एक कप कॉफी व दोन केक यावरच त्यांना अनेकदा आपली भूक भागवावी लागत असे. शिष्यवृत्तीच्या पैशातून घरखर्चासाठीही पैसे पाठवावे लागत असत. आपल्या आयुष्यात मिळालेल्या या परदेशातील शिक्षणाच्या संधीचा लाभ घेत असताना त्यानी प्रत्येक क्षण सोन्याचा कण मानून अभ्यास केला. केवळ मोठ्यातील मोठी विश्वविद्यालयीन पदवी मिळविण्यापेक्षा अनेक विषयातील मौलिक पारंगतता मिळविण्याची त्यानी जिद्द बाळगली. याच काळात त्यांच्या मनावर तेथील काही नामवंत प्राध्यापकांच्या व्यक्तिमत्वाचा चांगलाच परिणाम झाला. त्यामुळे स्वतःचे काम कळकळीने करून त्या कामातून त्यानी आपली स्वतःची एक विचारपध्दती निर्माण केली आणि म्हणून " शिक्षणासाठी मिळेल ती संधी प्रत्येकाने साधावी " अशी आपली ठाम समजूत त्यानी बोलून दाखविली.

## मान

**जीवनात आपण काय मिळविले, यावर आपला खरा मान अवलंबून नसतो, आपण जे काही मिळविले त्यामध्ये दुसऱ्यासाठी किती आहे, यातच खरा मान सामावलेला असतो**

परदेशीय शिक्षणाच्या शिष्यवृत्तीचा काळ संपला. बाबासाहेब भारताकडे येण्यास निघाले. ते दिवस पहिल्या महायुद्धाचे होते. भारतीय क्रांतीकारकांच्या उठावाने ब्रिटिश सरकारच्या नाकीनऊ आले होते. क्रांतीकारकांच्या वणव्यात बाबासाहेबानी उडी टाकावी अशी अनेकांची इच्छा होती. परंतु बाबासाहेब कृतज्ञ बुद्धीचे होते. ज्या बडोदा नरेशानी आपल्या परदेशीय शिक्षणासाठी अपरिमित मदत केली, त्याना दिलेले वचन न मोडता प्रथम आपला अभ्यास पूर्ण करणे, हे प्रथम कर्तव्य आहे असे ते मानत होते. आणि म्हणून आपला ठरलेला अभ्यास पूर्ण करून ते २१ ऑगष्ट १९१७ रोजी मुंबईस पोहोचले.शिक्षण क्षेत्रात त्यानी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करणेचे ठरले. त्यावेळचे शहर-दंडाधिकारी राव-बहादद्दूर चिमणलाल सेटलवाड यांच्या अध्यक्षतेखाली एक समारंभ घेण्याचे ठरले. सर्वाच्या मते बाबासाहेबांना मानपत्र देण्याचे ठरले, त्याप्रमाणे ते लोक या समारंभासाठी बाबासाहेबांची संमती घेण्यास गेले. त्यावेळी बाबासाहेब विनम्रपणे म्हणाले की, " मला मानपत्र नको. मी तुमच्यावर उपकार करण्यासाठी शिकलो नाही. मला परमेश्वर कृपेने संधी मिळाली म्हणून मी शिकलो. माझ्या प्रमाणेच इतरांना संधी मिळाली तर तेही माझ्या प्रमाणेच मोठ्या परीक्षेत उत्तीर्ण होतील. यास्तव तुम्ही माझ्या मानपत्रासाठी जो पैसा जमविला असेल तो आपल्या अस्पृश्य जातीतील लायक विद्यार्थ्यास शिष्य-वृत्ती देण्यासाठी उपयोगात आणा. "

**ज्ञान हे अमृत होय. ज्ञानामुळे आपल्या हीन-दीन परिस्थितीची आपणास जाणीव झाली पाहिजे. आणि त्यामुळे स्व-जीवन विकासाची दारे उघडली पाहिजेत.**

स्वराज्य हा सर्वांचा जन्मसिद्ध हक्क आहे. तसाच तो महारांचाही आहे, ही गोष्ट बाबासाहेब, त्या मूक समाजाचे नायकत्व पत्करून सांगत होते. शाहू महाराजांनी बाबासाहेबाना आर्थिक सहाय्य देऊन एक पाक्षिक काढावयास सांगितले. त्याप्रमाणे ३१ जानेवारी १९२० साली 'मूकनायक' नावाचे एक पाक्षिक सुरू करण्यात आले. 'मूकनायक' या पाक्षिकाच्या पहिल्या अंकात बाबासाहेब म्हणतात की, "हिंदुस्थान हा देश म्हणजे केवळ विषमतेचे माहेरघर होय. हिंदुसमाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे एक एक मजला आहे. या मनोऱ्यास शिडी नाही. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही, ज्या मजल्यात ज्यानी जन्मावे, त्यानी त्याच मजल्यात मरावे. खालच्या मजल्यातील इसम मग तो कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातील माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यावर लोटून देण्याची कुणाचीही छाती नाही. सचेतन तसेच अचेतन वस्तु ही सारी ईश्वराची रुपे आहेत, असे म्हणणारे स्वधर्मीयांचा विटाळ मानतात. साप्रंत ब्राम्हणांची महत्त्वाकांक्षा ज्ञानसंचय करण्याकडे आहे,ज्ञानाचा प्रसार करण्याकडे नाही.ब्राम्हणेतरांच्या अवनतीचे कारण सत्ता व ज्ञान ह्यांच्या अभावामुळे ते मागासले. त्यांच्या डोळ्यात ज्ञानाचे अंजन घालून त्याना आपल्या हीन परिस्थितीची जाणीव करून दिली पाहिजे."

**बंड**

---

**आत्मोद्धारासाठी झगडत रहावे. यासाठी ' तुम्ही काय केले पाहिजे ' यापेक्षा ' आम्ही काय करावे ' या गोष्टीवर अधिक भर दिला पाहिजे. आत्मोद्धाराच्या बळावरच गुलामगिरीविरूध्द बंड करता येईल.**

---

बाबासाहेबाना अस्पृश्य समाजास भोगाव्या लागणाऱ्या सर्व हालअपेष्टांचा अनुभव होता. दलितांची दुःखे पाहून त्यांचे मन मेण-बत्तीसारखे पाघळून जाई. यासाठी शेकडो वर्षे दुःखाचे चटके सोसून घायाळ झालेल्या अस्पृश्य समाजाच्या दारिद्र्याला त्याना वाचा फोडायची होती. अस्पृश्यांच्या गुदमरलेल्या जीवनात त्यांना नव-विचारांचे वारे निर्माण करावयाचे होते. ज्ञानप्रसाराच्या माध्यमातून या दलित समाजात आत्मविश्वास निर्माण करायचा होता. दुःख, दुर्दैव आणि दैन्य नष्ट करण्यासाठी वीरवृत्ती निर्माण करायची होती. यासाठी स्पृश्य समाजाच्या भूतदयावादी दृष्टीकोनाची त्याना गरज नव्हती. अस्पृश्यांच्या उध्दारासाठी कोणाच्या दयेच्या दानाची आवश्यकता नव्हती, हक्काची गरज होती. त्याहीपेक्षा ' उध्दरे-दात्मनात्मानम् ' या तेजस्वी पाठाच्या शिकवणीची आवश्यकता वाटत होती. आत्मोध्दार ज्याचा त्याने करायचा असतो हा महामंत्र त्याना द्यायचा होता. स्वतःच्या गुलामगिरीविरूध्द गुलाम जोपर्यंत बंड करून उठत नाही, तो पर्यंत त्याचा उध्दार होणार नाही. सर्व प्रकारच्या दुःखापासूत विमोचनही होणार नाही. जीवन जगण्याचा खरा अर्थही कळणार नाही. आणि म्हणून डॉक्टर बाबासाहेब म्हणत असत की, ' गुलामाला प्रथम त्याच्या गुलाम-गिरीची जाणीव करून द्या म्हणजे तो आपोआप बंड करील.'

## स्वावलंबन

---

**स्वाभिमान, स्वातंत्र्य,स्वाध्याय आणि स्वावलंबन ही चतु:सूत्री म्हणजे खऱ्याखुऱ्या जीवनाची गुरुकिल्ली होय. स्वावलंबन तर सुखी जीवनाची संजीवनी होय.**

---

बाबासाहेबांना दीन-दलितांची दुःखे दूर करावयाची होती. त्यांच्या जीवनात सुख निर्माण करावयाचे होते. त्यासाठी त्यांची मने जागी करायची होती त्यांना स्वाभिमान आणि स्वावलंबनाचे संजीवन द्यावयाचे होते. आणि म्हणूनच स्वजनाना आपल्या आर्त वाणीने ते म्हणत असत की, " तुमची ही दीनवदने पाहून व करुणाजणक वाणी ऐकून माझे हृदय फाटते. युगानुयुगे तुम्ही गुलामगिरीच्या गर्तेत गंजत पडला आहात. तरी तुमची भावना हीच आहे की, आपली ही दुर्दशा देवनिर्मित आहे. तुम्ही गर्भात असतानाच का मेला नाहीत ? जन्मास येऊन तुम्ही जगातील दुःख, दारिद्र्य व दास्य यांच्या अक्राळविक्राळ चित्राचा भेसूरपणा आपल्या अवनत व अपमानीत दुःखी जीवनाने वाढवीत आहात. जर तुमच्या जीवनाचे पुनरुज्जीवन होत नसेल, तर तुम्ही या जगातून नाहीसे होऊन जगाच्या दुःखाचे ओझे का कमी करीत नाही ? तुम्ही मनुष्यासारखे मनुष्य आहात. स्वतःच्या कर्तबगारीने जगात उत्कर्ष करण्यास प्रत्येकास स्वातंत्र्य आहे. तुम्ही या देशाचे रहिवासी आहात. तुम्हाला अन्नवस्त्र आसरा इतर भारतीयांच्या बरोबरीने मिळणे हा तुमचा जन्मसिध्द हक्क आहे आणि म्हणून तुम्हाला स्वाभिमानपूर्ण जिणे जगायचे असेल तर स्वावलंबन हाच खरा आत्मोन्नतीचा मार्ग होय हे लक्षात ठेवा. "

## बीज

**प्रगतीचे बीज जे अनिष्ट आहे त्याचा त्याग करून जे इष्ट आहे त्याचा स्वीकार करण्यात सामावलेले असते.**

डॉ. बाबासाहेबांना समाजातील सर्व गरीब लोकाविषयी अपार कळकळ होती. अशा गरीबांची वकीली करण्यासाठी ते रात्रंदिवस धडपडत होते. कारण त्यांच्या मनात गोरगरीबांच्या सुखी जीवनासाठी अखंड तळमळ होती. त्यांचे हृदय गरीब माणसाबद्दलच्या आपुलकीने भारावलेले होते, माणसाने माणसाला माणसाप्रमाणे वागविले पाहिजे या माणुसकीच्या भावनेने नटलेले होते. आणि म्हणूनच प्रथम सर्व अस्पृश्य वर्गाच्या प्रगतीसाठी त्यानी आपल्या जीवनाचा कर्मयज्ञ मांडलेला होता. अस्पृश्य वर्गाच्या प्रगतीविषयी डॉ. बाबासाहेब म्हणतात की, ' अस्पृश्य वर्गाची सुधारणा होण्यास दोन गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे. त्याच्या मनावर जो जुन्या खुळचट, अनिष्ट विचारांचा गंज चढला आहे तो धुऊन निघाला पाहिजे. आचार, विचार आणि उच्चार ह्यांची शुध्दी जोपर्यंत झाली नाही. तोपर्यंत अस्पृश्य समाजात जागृतीचे अथवा प्रगतीचे बीज कधीही रुजणार नाही. सद्यःस्थितीत त्यांच्या खडकाळ मनावर कसलेही नवे रोप उगवणार नाही. त्यांची मने अशारीतीने सुसंस्कृत होण्यास त्यांनी पांढरपेशाचा अवलंब केला पाहिजे. ''

## शिक्षण

**शिक्षणाशिवाय मनुष्य हा पशूसारखाच असतो. शिक्षणाशिवाय त्यास कुठे ही मानाचे स्थान मिळत नाही. जीवन सुखी होत नाही.**

सर्व अस्पृश्यवर्गाने प्रथम शिक्षण घेतले पाहिजे, या गोष्टीवर डॉ. बाबासाहेबांचा अधिक जोर होता. शिक्षणाशिवाय सर्व सुधारणांचे दरवाजे उघडणार नाहीत, शिक्षणाशिवाय शासकीय सेवेत काम मिळणार नाही, आणि शिक्षणाशिवाय आपले जीवन सुखी होणार नाही हे ओळखून डॉ. बाबासाहेब अस्पृश्य वर्गाच्या प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व थरावर काळजी वहात होते. आणि म्हणून शिक्षणाचे महत्व सांगताना ते म्हणत असत की,''आपल्याला आपल्या हिताचे असे काही करवून घ्यायचे असेल,तर सरकारी नोकरीत आपला प्रवेश आपण करून घेतला पाहिजे. नाहीतर आपली जशी हेळसांड होत आहे तशीच ती नेहमी राहणार आहे. ती न व्हावी हा जर आपला हेतू असेल,तर अस्पृश्यवर्गाच्या लोकांनी सरकारी नोकरीत आपला जास्त प्रमाणात शिरकाव होईल अशी व्यवस्था करावयास पाहिजे. यास्तव बहिष्कृत लोकांनी प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष न करता उच्च शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे.''

# देऊळ

**देव देवळात नसतो. देव माणसांच्या हृदयात असतो. माणसाला माणसाविषयी वाटणाऱ्या माणुसकीचे प्रतिक म्हणजे देऊळ होय.**

आपल्या समाजातील मंदीरे व पाणवठे ही विशिष्ट जातीची म्हणून जो पर्यंत राहतील तो पर्यत जातीभेद टिकून राहील. जाती-भेदाला मूठमाती द्यावयाची असेल तर आपल्या देशातील सर्व मंदीरे सर्व लोकांना खुली ठेवली पाहिजेत. नाही तर ही मंदीरेच माणसांच्या प्रगतीच्या मार्गावरील अडथळे होऊन बसतील. डॉ. बाबासाहेबांनी या गोष्टीचे मर्म जाणले होते. म्हणून ते म्हणत असत, "जोपर्यंत आम्ही आपणास हिंदू म्हणवीत आहो आणि तुम्ही आम्हास हिंदू समजत आहात, तोपर्यंत देवळात जाऊन देवदर्शन घेणे हा आमचा हक्क आहे, असे आम्ही समजतो. आम्हास एकजात निराळी देवळे नकोत. कारण देवळावाचुन आमचे काही अडलेले नाही. ज्यांना देवभक्ती करावयाची आहे, त्यांना देऊळच पाहिजे असे नाही. सामाजिक उपासना व सामाजिक ऐक्य यांच्यासाठी देवळे पाहिजे असतात. आम्हाला समाजात समान हक्क पाहिजेत ते आम्ही शक्यतोवर हिंदू समाजात राहून आणि जरूर तर कवडीमोल ठरलेल्या हिंदुत्वावर लाथ मारून मिळविणार आहोत आणि हिंदुत्वा-वर पाणी सोडण्याची पाळी आली, तर अर्थातच आम्ही देवळाच्या वाटेला जाणार नाही."

## स्वराज्य

**स्वराज्य आज मिळेल किंवा उद्या मिळेल. परंतु ते लोकशिक्षणाशिवाय टिकणार नाही, याची जाणीव लोकांमध्ये निर्माण करणे आवश्यक असते.**

आपण दीडशे वर्षे इंग्रजांच्या गुलामगिरीत घालविली, त्या काळात स्वराज्यासाठी लोकमत तयार करण्याची लाट निर्माण झाली खरी; परंतु ती समाजातील तळागाळातील लोकांना वर आणण्यात असमर्थ ठरली. हीच गोष्ट डॉ बाबासाहेबांनी अचूक शब्दात मांडली. ती अशी की, " लोकमत अनुकूल नाही म्हणून जर अस्पृश्यता लवकर नष्ट होणार नाही, तर लोकमत तयार नसताना स्वराज्याची घोषणा कशासाठी ? अन्यायाला परंपरा नाही. तो चालत आला आहे, म्हणून तो आणखी चालावा ही विचारसरणी रानवट माणसाची आहे न्यायाची चाड असेल तर ही रुढी बंद करा. अस्पृश्यांची माणुसकी जळून खाक झाली आहे, तिच्या विरुद्ध अस्पृश्यांनी बहिष्कार घालावा, असा आम्ही सल्ला दिला असता आम्हाला दूषण देण्यात येते. हा कोठला न्याय ? टिळकांसारखी एकादी व्यक्ती बहिष्कृत वर्गांत जन्मास आली असती आणि ब्रिटिश अमलाखाली झालेल्या मन्वंतराचा फायदा मिळून तशा गृहस्थाला तसेच उच्च शिक्षण मिळाले असते तर त्या गृहस्थाना ' स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे. ' अशी गर्जना करण्याच्या भरीस न पडता ' अस्पृश्यता निर्मूलन करणे हे माझे कर्तव्य आहे, असेच खात्रीने म्हटले असते. "

**सर्वांना सारखी संधी देऊन एकाच पातळीवर आणणे म्हणजे समता होय. समतेमुळेच समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या हिताची वाढ होत असते.**

डॉ. बाबासाहेबांना सर्व गोरगरीबांची प्रगती साधावयाची होती. सर्वांना समान संधी उपलब्ध करून द्यावयाची होती. त्यासाठी युगानुयुगे समाजाच्या तळागाळातील माणसांना हात देऊन वर उचलायचे होते. अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजांची पूर्ती करावयाची होती. यासाठी त्यांच्या मनात अज्ञान हे सर्वनाशाचे मूळ आहे ही जाणीव करून द्यावयाची होती. ज्ञान हे अमृत आहे, हे मनोमनी पटवून सांगावयाचे होते. म्हणून ते म्हणत असत की, " सामान्य माणसाला शिक्षण सुलभ होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. खालच्या वर्गांना उच्च शिक्षण ही फार खर्चाची बाब होता कामा नये. दुसरी गोष्ट अशी की, खालच्या वर्गाला वरच्या वर्गाच्या पातळीवर आणण्यासाठी त्याना सवलती दिल्या पाहिजेत. पाच आणि दहा या संख्याना दोहोंनी गुणले तर गुणाकार दहा व वीस येईल; म्हणून पाचाला दोहोंनी गुणून दहाला एकानेच गुणले पाहिजे. म्हणजे खालच्या वर्गाला भरपूर सवलती देऊन त्याना वरच्या वर्गाच्या पातळीवर आणले पाहिजे.असे करणे म्हणजे समता होय."

## शिक्षक

**आपल्या ज्ञानामृताचा सर्वांवरती सारखा अभिषेक करून विद्यार्थ्यांची हृदयकमले फुलवून टाकतो तो शिक्षक होय.**

शिक्षक हा समाजाच्या शिल्पकार असतो. शिक्षणातून समाज-परिवर्तन घडवून आणणारा तो एक प्रमुख घटक असतो. सहानुभूतीने ओथंबलेल्या हृदयाचा शिक्षकच तळागाळातील विद्यार्थ्यांना वर काढण्यासाठी सतत प्रयत्न करीत असतो. म्हणून सर्व शिक्षणाची सूत्रे ज्याच्या हाती असतात तो शिक्षक कसा असावा, यासंबंधी डॉ. बाबासाहेब म्हणतात, " शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र. ते एक राष्ट्रीयतेचे, मानवतेचे व अज्ञान दूर करण्याचे उदात्त कार्य आहे. शाळेत समबुध्दीचे, उदात्त, नि:पक्षपाती, थोर मनाचे शिक्षक पाहिजेत. शिक्षकवर्ग हा राष्ट्राचा सारथी आहे. कारण त्याच्या हाती शिक्षणाच्या नाड्या असतात. यास्तव शिक्षक कोण असावा यासारखा समाजसुधारणेच्या दृष्टीने पाहता, महत्वाचा प्रश्न दुसरा नाही. ब्राह्मण खालच्या वर्गातील लोकांचा तिरस्कार करतात. त्यांच्या बौध्दिक उत्कर्षाविषयी बेफिकीर असतात. त्याना जनावरापेक्षा ते कमी लेखतात. त्यांच्या कानी-कपाळी सदैव ओरडतात की, शिकणे हे तुमचे काम नाही. तुमचे काम मोल मजुरी करणे, शिक्षण हे ब्राह्मणांनीच करावे. म्हणून ब्राह्मणाच्या हाती शिक्षणाची सूत्रे देण्यात येऊ नयेत."

## पवित्र

---

**शरीराराने आणि मनाने जो शुद्ध असतो तो खराखुरा पवित्र होय. पवित्र माणसाच्या शद्बाला अग्नीचे तेज लाभलेले असते.**

---

महाडचे चवदार तळे सवर्ण हिंदूनी शुध्द केल्याची वार्ता डॉ. बाबासाहेबांचे कानावर आली. सार्वजनिक तळ्यावर अस्पृश्यांचा पाणी भरण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी लढा देण्याचा त्यांनी निर्धार केला आणि भीमगर्जना केली की, " अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरील कलंक नसून तो आमच्या देहावरील कलंक आहे. तो हिंदु धर्मावर आहे असे आम्ही मानत होतो. आता तो आमच्यावरील आहे. ह्यासाठी तो धुऊन काढण्याचे पवित्र कार्य आमचे आम्हीच स्वीकारले आहे. त्या कार्यासाठी आमच्यापैकी काही जणाना आत्मयज्ञ करावा लागला तरी हरकत नाही. ईश्वरी नेमानेम तसा असेल तर आम्ही स्वतःस भाग्यवान समजतो. तुम्ही तळे शुध्द करून आमची अपवित्रता सिध्द करण्याचा जो नीचतम प्रयत्न महाड येथे केला आहात तसा आणखी हवा तर करा. पण आम्ही पवित्र आहोत हे तुमच्यामुखे वदवून घेतल्याखेरीज आमची शांती होणार नाही. " असे म्हणून महाडच्या चवदार तळ्यावर सत्त्याग्रह करण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्णय प्रकट केला. तो निर्णय महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यातून निनादत गेला.

# सत्याग्रह

---

**जर एखादे कार्य सत्य असेल, तर त्याबाबतीत धरलेल्या आग्रहास सत्याग्रह म्हणतात. आणि जर एखादे कार्य असत्य असेल तर त्या बाबतीत धरलेल्या आग्रहास दुराग्रह म्हणतात.**

---

महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह करण्याचा डॉ. बाबासाहेबांचा निर्णय महाराष्ट्रभर पसरला. या सत्याग्रहासाठी समाजाच्या सर्व थरातील लोकांना बाबासाहेबांनी आव्हान केले. तत्वासाठी चाललेल्या या झगड्यात प्रत्येक जातीच्या व्यक्तिला भाग घेता येईल ही गोष्ट पटवून सांगताना डॉ. बाबासाहेब म्हणाले, ' कोणत्याही कार्यात यशप्राप्ती होईल किंवा नाही हे जितके साधन सामुग्रीच्या प्रमाणावर अवलंबून असते. तितकेच ते कार्याच्या नैतिक स्वरूपावरही अवलंबून असते. कार्याच्या मुळाशी जर सत्य असेल, तर त्यात यशप्राप्ती होण्यास चिंता करण्याचे विशेष कारण नाही. कारण सत्याग्रहीच्या ठायी आत्मबल पाहिजे. आत्मबल हे आपण करतो ती गोष्ट योग्य आहे किंवा नाही यावर अवलंबून असते. म्हणून त्या गोष्टीची खात्री पाहिजे. म्हणून सत्य म्हणजे काय त्याची खूण सत्याग्रहीस पटणे आवश्यक आहे. ज्या कार्यापासून लोकसंग्रह होत आहे ते सत्कार्य, त्यासाठी केलेला आग्रह, हा सत्याग्रह. बुध्दी शुध्द नसेल तर लोकविग्रह होईल, स्वार्थमूलक हेतूमुळे विग्रह होईल. जिथे लोकसंग्रह आहे तिथे सत्कार्य आहे. ''

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा.क. 3986
संबंध 28828
2/2/८९
शाखा (स्थळ प्रत)

## धर्म

**ज्याच्या योगाने संसारातील उन्नती प्राप्त करता येते त्यास धर्म असे म्हणतात. स्वतःच्या उन्नतीबरोबर जेव्हा देशाची उन्नती साधली जाते तेव्हा तो खराखुरा धर्म होय.**

माणसा माणसामधील धर्म एकच असेल तर हक्कही सर्वांना सारखेच असले पाहिजेत. जो धर्म माणसा-माणसात भेद निर्माण करतो, अपराध नसताना वाईट रितीने वागवितो. नरक यातना भोगावयास लावतो, जनावरांना मिळणाऱ्या सवलतीही मिळू देत नाही, तो धर्म कसला ? डॉ. बाबासाहेब देशहितात आपले हित पाहणाऱ्या धर्मासंबंधी सांगतात की, " अस्पृश्यता ही एक गुलामगिरी आहे. गुलामगिरी व धर्म एकत्र नांदू शकत नाहीत. ही जोडी असंभाव्य आहे. आत्म सन्मानास मुकवून कोठल्याही समाजाचा उध्दार होणार नाही. अस्पृश्यतेमुळे अस्पृश्यांचे नुकसान झाले आहे असे नसून त्यांच्याबरोबर स्पृश्यांचे, तसेच देशाचेही नुकसान झाले आहे. अस्पृश्यतेच्या गर्तेतून निघून त्यांचे आत्मस्वातंत्र्य त्यास प्राप्त झाले, तर ते केवळ आपलीच उन्नती करतील इतकेच नव्हे तर ते आपल्या पराक्रमाने, बुध्दीने, उद्योगाने देशाच्या भरभराटीस कारणीभूत होतील. आमची चळवळ केवळ पतितोध्दाराची नसून लोकसंग्रहाची आहे. आम्ही आपली शक्ती माणुसकी मिळविण्यासाठी खर्च करण्याचा निश्चय केला आहे. आम्ही जे कार्य आरंभिले आहे ते स्वतःच्या उध्दारापुरते नसून हिंदु धर्माच्या उध्दाराकरिता आहे, हेच खरे राष्ट्रकार्य आहे. "

**पवित्र अंतःकरणाने केलेली पूजा देवापर्यंत जाऊन पोहोचते. कोणताही देव देवालयातील प्रवेशाबद्दल कोणालाही मज्जाव करत नाही.**

अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात अस्पृश्य हिंदूना प्रवेश मिळविण्याविषयी सत्याग्रह करण्यात आला. देव देवळात येणाऱ्या माणसांचा नमस्कार स्वीकारीत असतो. देवाला सगळी माणसे सारखीच असतात. परतु धर्म, जात, वर्ण व वंश या गोष्टींच्या नावावर माणसा-माणसामध्ये भेदाच्या भिंती तयार केल्या गेल्या आहेत. खरे तर कोणाच्या मदीरात जाण्याने देव विटाळत नाही किंवा कोणाच्या न जाण्याने देव रागावत नाही. डॉ. बाबासाहेब याविषयी मार्मिकपणे म्हणतात की, ' निराकाराचे पूजन, निराकाराचे ध्यान व नामोच्चार हे उपासनेपैकी विविध मार्ग आहेत. साकाराचे पूजन करावयाचे असल्यास, प्रत्येक हिंदूस मोकळीक असावी. ज्याचा त्याचा देव निराळा स्थापणे हे अयोग्य आहे. काळ्या लोकासाठी दक्षिण आफ्रिकेत निराळे डबे असतात. मग तुम्ही तक्रार का करता ? प्रश्न नुसता प्रवासाचा नसून समानतेचाही आहे. देवळात केवळ साकाराचे प्रत्यक्ष पूजन करता यावे म्हणून अस्पृश्यांना देवळात प्रवेश पाहिजे असे नाही. त्याना ही गोष्ट सिध्द करायची आहे की, त्यांच्या प्रवेशाने देवालय भ्रष्ट होत नाही, किंवा स्पर्शाने मूर्तीचे पावित्र्य कमी होत नाही. म्हणून निरनिराळ्या देवतांची स्थापना नको. देवळे जरी स्पृश्य हिंदुनी बांधली तरी ती हिंदुधर्माची असून हिंदु धर्माकरीता बांधलेली आहेत. "

**माणूस हा इथून तिथून सारखाच. परंतु माणसा–माणसामध्ये माणसानीच भेद निर्माण केलेले असल्यामुळे माणूस म्हणून जगणे दुःखद होऊन बसले आहे.**

महाडच्या चवदार तळ्याजवळ एकदाचे सर्व सत्त्याग्रही आले. तळ्याचा आसंमत माणसानी फुलून गेला. ' महाड सत्याग्रह की जय ' ' बाबासाहेब आंबेडकर की जय ' या गगनभेदी घोषणानी सारा परिसर हादरून गेला. साऱ्या सत्याग्रहींना उद्देशून डॉ. बाबासाहेब गंभीरपणे बोलू लागले, " महाडचे तळे सार्वजनिक आहे. महाड येथील स्पृश्य इतके समजूतदार आहेत की, ते आपणच या तळ्याचे पाणी नेतात असे नव्हे तर कोणत्याही धर्माच्या माणसाला त्या तळ्याचे पाणी भरण्यास त्यानी मुभा ठेवली आहे. मानव योनीपेक्षा कमी मानलेल्या पशुपक्ष्यांच्या योनीतील जीवजंतुसही त्या तळ्यावर पाणी पिण्यास ते हरकत घेत नाहीत. महाडचे स्पृश्य लोक अस्पृश्यांना चवदार तळ्याचे पाणी पिऊ देत नाहीत. याचे कारण अस्पृश्यांनी स्पर्श केला असता ते पाणी नासेल किंवा त्याची वाफ होऊन ते नाहीसे होईल अशामुळे नव्हे. अस्पृश्याना ते पाणी पिऊ देत नाहीत, चवदार तळ्यातील पाणी प्याल्याने आम्ही अमर होऊ अशातला भाग नाही. आजपावेतो चवदार तळ्याचे पाणी प्यालो नव्हतो, तरी तुम्ही आम्ही काही मेलो नव्हतो, इतराप्रमाणे आम्ही देखील माणसेच आहोत हे सिद्ध करण्याकरताच त्या तळ्यावर आपणास जावयाचे आहे. "

**आपण जसे बोलतो तसे वागत नाही. त्यामुळे आपली दुर्बलता वाढते. दुर्बलतेमुळे व्यक्ती किंवा राष्ट्र समर्थ होऊ शकत नाही.**

डॉ. बाबासाहेब सर्व माणसाना समानतेच्या फुटपट्टीने मोजून त्यांच्या जीवनात समतेचे नवे वारे निर्माण करीत होते. माणसे जन्मतः समान दर्जाची असतात व मरेपर्यंत समान दर्जाचीच राहतात. माणसांचे जन्मसिध्द हक्क कायम राहावेत यासाठी भेदाभेद विसरून वागले पाहिजे. हा विचार सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात. " नुसती रोटीबंदी किंवा बेटीबंदी गेली म्हणून अस्पृश्यता गेली असे मानण्याचा मूर्खपणा करू नका. बेटीबंदीचे उच्चाटन करणे हाच खरा समतेचा मार्ग आहे. आपल्या लोकांना पोलीसात किंवा कोर्ट-कचेरीत औषधाला सुध्दा प्रवेश मिळावयाचा नाही, कारण हिंदू लोक आपणास अश्पृश्य मानतात व हीन लेखतात म्हणून सरकार आपल्या नोकरीत आम्हाला प्रवेश देवू शकत नाही. तसेच अस्पृश्यतेमुळे आपल्या हातचा कोणी माल घेणार नाही म्हणून उजळ माथ्याने आपणास धंदा करता येत नाही. यासाठी हिंदु समाज समर्थ करायचा असेल, तर चातुर्वण्य आणि असमानता यांचे उच्चाटन करून हिंदुसमाजाची रचना एकवर्ण नि समता या दोन तत्वांच्या पायावर केली पाहिजे. अस्पृश्यता निवारणाचा मार्ग हा हिंदुसमाज समर्थ करण्याच्या मार्गापासून भिन्न नाही म्हणून मी म्हणतो की, आपले कार्य जितके स्वहिताचे आहे, तितकेच राष्ट्रहिताचे आहे यात काही किंतु नाही. "

**स्वातंत्र्य प्राप्त करून देखील आपण आपणापुरतेच पहात राहिलो तर त्या स्वातंत्र्यापासून सुख मिळणार नाही आणि म्हणून स्वार्थत्याग करून ऐक्य जोपासले पाहिजे**

भाषावार प्रांतरचना करण्यामध्ये अनेक अडचणी असतात. भाषा हे मानवी अभिव्यक्तीचे साधन आहे. परंतु भाषेच्या निकषावर प्रांतरचना करण्यामध्ये अनेक प्रकारचे धोकेही सामावलेले आहेत. ' एक जग : एक मानव ' ही भावना वाढीस लावण्यामध्ये भाषा ही एक अडचण आहे. भाषेच्या माध्यमातून ऐक्य भावनेची जोपासना झाली पाहिजे. परंतु भाषेचा प्रश्न हा अनेक दृष्टीने वादाचा विषय होऊन बसतो. आणि म्हणून भाषावार प्रांत रचनेचे तत्व इतके व्यापक गुंतागुतीचे आहे की ते प्रत्यक्षात उतरविणे अगदी कठीण आहे. या तत्त्वाची अंमलबजावणी करताना अनेक प्रकारच्या गोष्टींची अव्यवहार्यताच सिध्द होईल. यासाठी डॉ. आंबेडकर म्हणतात की, " आज जर राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल, तर ती जनतेच्या मनात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याची होय. आपण प्रथम भारतीय असून नंतर हिंदू, मुसलमान, सिंधी व कानडी अशी भावना निर्माण करण्यापेक्षा आपण प्रथमतः भारतीय व नंतरही भारतीयच आहोत, अशी भावना निर्माण केली पाहिजे. हा आदर्श दृष्टीसमोर ठेवायचा असेल तर ज्यामुळे संकुचित प्रांताभिमानाची व व पक्षाभिमानाची वाढ होईल, अशा सर्व गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत "

## पुरोहित

---

**पुरोहित वर्ग हा सर्व समाजात एकता निर्माण करू शकत नाही. पुरोहिताच्या सोवळ्यामुळे समाजात सावळा गोंधळ माजलेला दिसतो.**

---

आपल्या समाजात फार पूर्वीपासून पुरोहित वर्गाचे प्राबल्य आहे. वंशपरंपरेने चालत आलेला पुरोहित वर्ग हा सर्वसामान्य अज्ञानी समाजाच्या बळावर टिकून राहिला आहे. मनुष्य जन्माला येतो, तो वाढतो, तो काम करतो व शेवटी मरतो. या सर्व वेळी पुरोहित मात्र आपले पोट भरून घेतो. माणसांच्या सुखदुःखात एकाद्या स्थितप्रज्ञाची भूमिका पत्करून स्वतःच्या फायद्याकडे नजर ठेवून असतो. समाजातला हा ढोंगी वर्ग समाजाला लुटत असतो. अज्ञान, अंधःश्रद्धा आणि देवभोळेपणाच्या कचाट्यात सापडलेल्या माणसाची हा पुरोहित पिळवणूक करत असतो. आणि म्हणून या पुरोहित वर्गाच्या उच्चाटनाविषयी डॉ. बाबासाहेब मोठ्या संतापाने म्हणतात की, " पुरोहित वर्ग म्हणजे संस्कृतीच्या चक्राची चालना बंद पाडणारा अडसरच होय. अज्ञात शक्ती आणि असहाय्य मानव ह्यांच्यातील मध्यस्थाच्या भूमिकेची बतावणी करून त्यावर भिक्षुक आपली उपजीविका करतो, विवाहासारखा एखादा आनंदप्रद प्रसंग असो अथवा मृत्यूसारखा दुःखद प्रसंग असो, उपाध्याय वर्ग या दोन्हींपासून आपला सारखाच लाभ करून घेतो. एका पारशी पत्रकाराने मार्मिकपणे म्हटल्याप्रमाणे आपल्या भक्ष्यावर उदरभरण करण्यासाठी त्यांच्यापैकी बहुतेक प्रार्थना करतात. "

**क्रांती म्हणजे परिवर्तनाची पहाट होय. समाजात घडून येणारा खराखुरा खांदेपालट होय. समाजातील सर्व शक्तीच्या सुखाचा विचार क्रांतीपोटीच उदयास येतो.**

८ ऑगस्ट १९३० रोजी नागपूर येथे अखिल भारतीय बहिष्कृत वर्गाची परिषद भरली होती, अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. लोकशाहीच्या प्राणभूत शक्तीवर त्यांचा विश्वास होता. मानवी मूल्य मान्य करणे आणि प्रत्येक व्यक्तीला आपला उत्कर्ष साधण्याची संधी देणे यातच लोकशाहीची प्रतिष्ठा असते. हे ओळखून क्रांती विषयी आपला विचार सांगताना डॉ. बाबासाहेब म्हणतात, ' क्रांती हा असहकारितेचा प्राण आहे व धावपळ वा दाणादाण ही तिची रीत आहे. क्रांती रक्तलांछित वा रक्तहीन असो, परिणाम एकच. क्रांती म्हणजे स्थित्यंतर. क्रांती सुरू झाली म्हणजे तिच्या निर्णयाविषयी सारीच अनिश्चितता असते, क्रांती पुष्कळदा अटळ असते, तरीसुद्धा क्रांती व खरेखुरे सामाजिक स्थित्यंतर यातील फरक विसरता कामा नये. क्रांती एका पक्षापासून दुसऱ्या पक्षाच्या वा एका राष्ट्राकडून दुसऱ्या राष्ट्राच्या स्वाधीन राजकीय सत्ता करते. अस्पृश्य वर्गीयानी नुसत्या राजकीय स्थित्यंतरावरच कोरडे समाधान मानून राहू नये. राजकीय सत्तेची अशा तऱ्हेची विभागणी झाली पाहिजे की, त्यामुळे समाजात खरा पालट होऊन समाजात वावरणाऱ्या परस्पर बळाबळाच्या शक्तीत फरक पडेल. ''

**सुखाच्या दिशेने वाटचाल करत असताना काही प्राणभूत प्रेरणांचा अंगी संचार होत असतो. त्यामुळेंच जीवनाचे ध्येय गाठणें सुलभ होते.**

आपणास स्वराज्य का पाहिजे ? आपले दारिद्र्य संपावे व खरे सुख सुरू व्हावे यासाठी ! ! परंतु ब्रिटीशांनी आपणास स्वराज्यापासून सतत दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. देशात उद्योग व व्यापार वाढू दिला नाही. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव हा विचार ठसू दिला नाही. आणि म्हणूनच ' स्वराज्य हेच ध्येय मानावे ' यासाठी डॉ. बाबासाहेब सांगतात की, ' ब्रिटीशानी सुधारलेली विधिपद्धती आणि सुव्यवस्था यांची देणगी हिंदुस्थानास दिली ही गोष्ट खरी. तथापि माणसे केवळ विधिपध्दतीवर व सुव्यवस्थेवर जगत नाहीत. तर ती अन्नावर जगतात हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या दैन्यावस्थेचा शेवट ब्रिटिशांच्या राज्यात होणार नाही तर तो स्वराज्याच्या घटनेद्वारा आपल्या हाती राजकीय अधिकार आल्यानेच होऊ शकेल. त्यानंतर लोकांचे कल्याण साधणे शक्य आहे. म्हणून आपल्या गतकाळातील घटनांचा आता विचार करून घाबरु नका. आपले मत ठरवितेवेळी कोणाच्या मर्जीचा किंवा कृपेचा तुम्ही विचार करून आपल्या मतावर दडपण आणू नका. आपल्या हिताकडे लक्ष देऊन स्वराज्य हेच ध्येय मान्य करा. "

**आपली उन्नती आपणच करावयाची असते. आपली उन्नती झाल्याबरोबर लोक आपल्याकडे आदराने पाहतात. यासाठी स्वतःच्या उन्नतीसाठी सतत धडपड केली पाहिजे.**

अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी अस्पृश्यानीच झटले पाहिजे. बाहेरून कोणी येईल व तो आपला उध्दार करील, असे समजणे चूक आहे. अनादिकालापासून अस्पृश्य समाज दारिद्र्यामध्ये पिचत पडला आहे. ‘ मुकी बिचारी कुणी हाका ’ अशी अस्पृश्यांची दयनीय स्थिती आहे. अशा स्थितीत अस्पृश्यांना उपदेश करताना डॉ. बाबासाहेब म्हणतात, “ तुम्हाला एक गोष्ट उघडपणे सांगण्याची मी संधी देत आहे. ती म्हणजे अस्पृश्यांच्या सर्व दुःखावर राजकीय सत्ता हाच एकमेव उपाय नाही. त्यांनी आपली सामाजिक पातळी उंचावण्यातच त्यांचा उध्दार आहे. त्यानी आपली राहणी सुधारली पाहिजे. त्यांच्या राहणीत व वागणुकीत असा फरक पडला पाहिजे की, त्यामुळे त्यांच्याविषयी आदर व मैत्री वर्धिंगत होईल. त्यांनी शिक्षण घेतले पाहिजे. निव्वळ लिहिणे, वाचणे, अंकगणित यांची ओळख असणे याने काहीही होणार नाही. त्यांच्या केविलवाण्या आत्मसंतुष्ट वृत्तीतून त्यांना धक्के देऊन जागे करण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या ठायी ज्याच्यापासून मनुष्याची उन्नती होते तो दैविक असंतोष निर्माण केला पाहिजे. ”

**तुम्ही स्वतःला हीन लेखू नका, कोणीच उच्च वा नीच असत नाही. मनुष्याच्या कृतीमुळेच मनुष्याचे मूल्य ठरत असते.**

अस्पृश्य समाज हा पिढ्यान् पिढ्या दबलेला आणि दडपला गेलेला समाज आहे. अस्पृश्यांची आर्थिक गुलामगिरी संपली पाहिजे. त्यांचा सामाजिक दर्जा उचावला गेला पाहिजे. त्यांना आपल्या खऱ्याखुऱ्या दुःखाची जाणीव झाली पाहिजे. या गोष्टीवर डॉ. बाबासाहेब सतत अधिक भर देत असत. म्हणत असत की, " संसारामध्ये मनुष्याला जी सुखदुःखे भोगावी लागतात, ती ईश्वरी इच्छेनेच येतात. दारिद्र्य हे आपणासाठीच आहे असे लोक मानतात. आपणास असे नीच मानण्याची वृत्ती सोडा. सहभोजन व मंदीर प्रवेश ह्यांना माझा विरोध नाही. पण ह्या प्रकाराने आपणास राजकीय हक्क मिळणार नाहीत. ह्यामुळे जे कायदे व्हायचे ते अस्पृश्य वर्गाच्या संमतीनेच होतील. ही एक समाजक्रांती आहे. आपणाला संसार चालविण्याची आवश्यकता आहे. भाकर, कपडा व राहण्यास जागा आपणास मिळाली पाहिजे. अस्पृश्य वर्गातील जातिभेद नष्ट करा. "

## समान

**समानता हा सुखी जीवनाचा पाया आहे. काही समान गोष्टी सर्वत्र दिसू लागल्या तर संघर्ष नष्ट होईल. काही समान तत्त्वावर निष्ठा ठेवून चालण्यात धैर्य लागते.**

डॉ. बाबासाहेब यांना काही समान गोष्टीवर भर देऊन समाजरचना करावयाची होती. काही समान तत्त्वावर समाजाची जडणघडण करावयाची होती. त्यासाठी धर्मांतर करावे लागले तरीही चालेल, अशी त्यांची धारणा होती. ज्या जगात माणसाप्रमाणे राहणे, खाणे, पिणे आणि स्वतःचा उत्कर्ष करून घेणे सहज शक्य होईल, असा धर्म बेधडक स्वीकारावा, असे त्यांचे मत होते. आणि म्हणूनच समान तत्त्वावरील निष्ठा व्यक्त करताना ते म्हणतात, ' आपले माणुसकीचे साधे अधिकार मिळविण्यासाठी आणि हिंदु-समाजामध्ये समान दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी केलेली चळवळ निष्फळ ठरली आहे. त्या चळवळीसाठी व्यतीत केलेला वेळ, काळ, आणि पैसा ही वाया गेला आहे. आणि म्हणून आपण या गोष्टीसंबंधी अखेरचा निर्णय घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आपली ही दुर्बलतेची आणि अवनतीची स्थिती आपण हिंदुसमाजाचे घटक आहोत म्हणून आपल्यावर ओढवली आहे. म्हणून जो धर्म आपल्याला समान दर्जा देईल, समान हक्क देईल आणि योग्य तऱ्हेने वागवील अशा एखाद्या दुसऱ्या धर्मात जावे असे तुम्हाला वाटत नाही का ? दुर्दैवाने मी अस्पृश्य जातीत जन्माला आलो हा काही माझा अपराध नाही. परंतु मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही. '

## शक्ती

**शक्ती म्हणजे जीवन होय. शक्तीच्या जोरावर सुख प्राप्त करता येते. आणि म्हणून दुर्बलतेचा त्याग करून आज शक्तीची आराधना केली पाहिजे.**

डॉ. बाबासाहेब धर्मांतर करणार हा विचार सर्वत्र पसरला. धर्मांतराविषयी बाबासाहेबांचे काय मत आहे हे सर्व धर्माच्या लोकांनी आजमाविण्यास सुरवात केली. ज्या समाजाच्या हितासाठी धर्मांतर करावयाचे त्या समाजाचे हित डोळ्यासमोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत, "धर्मांतराने तुमच्याजवळ गमावण्यासारखे काहीच नाही. तुम्ही फक्त तुमच्या बेड्याच गमावणार आहात. धर्मांतराने तुम्हास अनेक गोष्टी लाभणार आहेत सामाजिक दृष्टया धर्मांतराच्या प्रश्नाकडे पाहिले तर हा झगडा वरवर जरी सामाजिक दर्जासाठी दिसला, तरी तो प्रायः वर्गीय लढाच आहे. हक्कदार आणि बेकार यांच्यात जो अविरत झगडा सुरू आहे त्याचा वरिष्ठांचा जुलूम हा एक भाग आहेच. झगडा यशस्वी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तीन शक्तींची अस्पृश्यांच्या ठायी उणीव आहे. त्या शक्ती म्हणजे मनुष्यशक्ती, द्रव्यशक्ती व बौध्दिक शक्ती. ह्या तिन्ही शक्ती तुम्ही हिंदु समाजात असेपर्यंत तुम्हाला प्राप्त होणार नाहीत.

**शिक्षा शारीरिक असो अथवा मानसिक असो दु:खदायक असते प्रत्येक गोष्ट सद्सदविवेकबुद्धीने करत गेलो तर आपली या दु:खापासून सुटका होईल.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या धर्मांतराच्या विचाराची व्यापक सामाजिक भूमिका आपल्या बोलण्यातून व्यक्त करू लागले होते. म्हणत होते की, ' धर्म हा मनुष्याकरीता आहे. मनुष्य धर्मा-करीता नाही. या जगात समाज एकसंघ करायचा असेल आणि यश संपादन करायचे असेल, तर हिंदु धर्माचा त्याग करा. जो धर्म तुम्हास माणूस म्हणून ओळखावयास तयार नाही. जो तुम्हास पाणी मिळू देत नाही. जो धर्म या संज्ञेला अपात्र आहे. जो धर्म तुम्हाला शिक्षण मिळू देत नाही, तुमच्या ऐहिक उत्कर्षाच्या आड येतो तो ' धर्म ' या संज्ञेला पात्र नाही, जो धर्म आपल्या अनुयायाना आपल्या धर्म बांधवांशी माणुसकीने वागण्यास शिकवीत नाही, तो धर्म नसून रोग आहे. जो धर्म आपल्या अनुयायाना अमगल जनावरांना स्पर्श सहन करावयास शिकवितो, परंतु माणसांचा स्पर्श चालू देत नाही,तो धर्म नसून शुध्द वेडगळपणा आहे. जो धर्म काही वर्गाना शिक्षणापासून दूर ठेवतो, त्याना धनसंचय करू देत नाही. शस्त्र हाती घेऊ देत नाही तो धर्म नसून माणसाच्या जीवनाचे विडंबन आहे, जो धर्म अज्ञानाना अज्ञानी, निर्धनाना निर्धन राहा असे म्हणतो तो धर्म नसून शिक्षा आहे. ''

---

**जीवनाच्या वाटेवर अनेक प्रश्न पसरलेले असतात. सर्व प्रश्नांची उत्तरे होकारार्थी येण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते.**

---

शतकानुशतके अस्पृश्य समाजाच्या वाट्याला दारिद्र्य, आणि दुःख याशिवाय काहीच आले नाही. त्यांची गाऱ्हाणी जशी पूर्वी होती, तशीच आजही दिसून येतात. राज्यसत्ता बदलल्याबरोबर अस्पृश्यांच्या स्थितीमध्ये बदल व्हावयास पाहिजे होता, पण तसे घडले नाही. या गोष्टीचा सारा दोष ब्रिटीश सरकारला देत असताना डॉ. बाबासाहेब म्हणतात की, " ब्रिटीश राज्य येण्यापूर्वी आमची जी करुणाजनक स्थिती होती त्यात काडीमात्रदेखील फरक झालेला नाही. ब्रिटीश राजवटीपूर्वी आम्हाला खेड्यातील विहीरीवर पाणी भरण्याची मनाई होती. ब्रिटीश सरकारने हा न्याय आम्हाला मिळवून दिला काय ? ब्रिटीश राजवटीपूर्वी आम्हाला मंदिर प्रवेशाची बंदी होती. आज आम्हाला देवळात प्रवेश करता येतो काय ? ब्रिटीश राजवटीपूर्वी लष्करामध्ये आमच्या लोकांना नोकरी मिळत असे. आज ब्रिटीश सरकार लष्करामध्ये आम्हाला घेते काय ? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे आम्ही नकारार्थी देतो. आमची दुःखे ही वहात राहिलेल्या जखमासासारखीच आहेत. ब्रिटीश राजवट सुरू होऊन सव्वाशे वर्षे लोटली. तरीही आमची दुःखे दूर झालेली नाहीत. ती तशीच आहेत. आमचा प्रश्न भिजतच पडला आहे. आणि म्हणून आज भारतातील अस्पृश्य वर्ग म्हणून त्यानी अस्पृश्य वर्गाचा हा प्रश्न सोडविण्याबाबत मानवतेच्या पातळीवरून आपले पुण्यकर्म करावे. "

## जन्मभूमी

---

**जननी व जन्मभूमी स्वर्गाहून प्रिय असते. मायभूमीच्या मातीशी जुळलेली नाती अतूट असतात. कारण जननी आणि जन्मभूमीसाठी केलेल्या सेवेचे मूल्य मागितले जात नाही.**

---

मणिभवन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गांधीजींची भेट झाली. या दोन महापुरुषामध्ये अनेक प्रश्नावर चर्चा झाली. मायभूमीने आपणास जे प्रेम द्यावयास पाहिजे होते, त्या प्रेमापासून सारा अस्पृश्य समाज कसा वंचित राहिला याबद्दल अत्यंत तळमळीने डॉ. बाबासाहेब गांधीजीना म्हणतात, ' आपण म्हणता मला मायभूमी आहे. पण मी पुन्हा सांगतो की मला मायभूमी नाही. ज्या देशात कुत्र्याच्याही जिण्याने आम्हाला जगता येत नाही, कुत्र्यामांजरांना जेवढ्या सवलती मिळतात, तेवढ्या सवलतीही आम्हाला गुण्यागोविंदाने ज्या देशात मिळत नाहीत, त्या भूमीला माझी जन्मभूमी आणि त्या भूमीतील धर्माला माझा धर्म म्हणण्यास मीच काय पण ज्याला माणुसकीची जाणीव झाली आहे व ज्याला स्वाभिमानाची चाड आहे असा कोणताच अस्पृश्य तयार होणार नाही. ह्या देशाने आमच्या बाबतीत इतका अक्षम्य गुन्हा केला आहे की, आम्ही त्याचा कसलाही व कोणताही भयंकर द्रोह केला तरी त्यामुळे घडणाऱ्या पापाची जबाबदारी आमच्या शिरावर पडणार नाही. असे असल्यामुळे मला अराष्ट्रीय म्हणून कोणी कितीही शिव्या दिल्या तरी त्याबद्दल विषाद मानून घेण्याचेही मला प्रयोजन नाही. '

**हक्क आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हक्कांची बूज राखून सतत कर्तव्यास सामोरे जाण्यात अपार आनंद असतो.**

अस्पृश्य समाजास मोक्ष मिळावा म्हणून त्यांना मंदिर प्रवेश नको होता. अस्पृश्यांना मानवी हक्कांची जाणीव व्हावी व त्यासाठी झगडण्याची इच्छा त्यांच्या मनामध्ये निर्माण व्हावी यासाठी त्याना मंदीर प्रवेश पाहिजे होता. मानवी हक्कांची जपवणूक करून कर्तव्याकडे बोट दाखविण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब म्हणतात, " आज जिकडे तिकडे अस्पृश्यासाठी देवालयांचे दरवाजे उघडण्याचा प्रयत्न चालू आहे. परंतु देवालयात जाण्यास मिळाले म्हणजे अस्पृश्यांचा उद्धार होणार आहे असे नाही, हे मुळीच विसरता कामा नये देवालयातील मूर्तीभोवती खेळणाऱ्या परमार्थिक भावापेक्षा पोटाची खळगी कशी भरेल याची काळजी अस्पृश्यांनी अधिक बाळगली पाहिजे. खाण्याला पुरेसे अन्न नाही, अंगभर वस्त्र नाही, शिक्षणाची सोय नाही, द्रव्याच्या अभावी औषधपाणी घेता येत नाही, अशा दैन्यावस्थेत सापडलेला आपला समाज आहे. मिळालेल्या राजकीय हक्कांचा उपयोग जीवनातील सुखसोयी, उपभोगण्यास मिळतील अशा ध्येयाने, दिशेने तुम्ही केला पाहिजे. "

## जागृती

**जीवन जगण्याच्या नव्या विचारांचा ध्येय-ध्यास लागला की जीवन-जागृती घडून येत आहे, असे म्हणता येईल. अशा जागृतीमधून जीवनाच्या साऱ्या दिशा उजळून जातात.**

बेलासीस रोड येथील १९३२ सालची गोष्ट. डॉ. बाबासाहेब अस्पृश्य समाजाच्या खडतर आयुष्य क्रमावर प्रकाश टाकत होते. भोळसट कल्पनामुळे अस्पृश्य समाजाचे आजपर्यंत पुष्कळ अकल्याण घडून आले आहे. काल्पनिक मोक्षप्राप्तीच्या मोहात अडकून गेल्यामुळे अस्पृश्यांच्या आयुष्याची धूळधाण झालेली आहे. आणि म्हणून जीवनाच्या वास्तविकतेकडे लक्ष वळविण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब म्हणतात की, " गळ्यातील तुळसीच्या माळा तुम्हास मारवाड्याच्या कैचीतून मुक्त करण्यास उपयोगी पडत नाहीत तुम्ही रामनामाचा जप करता म्हणून घरवाला तुम्हाला भाड्याची सूट देत नाही, अगर वाणी आपले पैसे कमी करत नाही. समाजाचा अत्यंत मोठा भाग ह्या गूढ कल्पनात गढून गेल्यामुळे काही आपमतलबी माणसांचा कावा साधतो. ' ये रे माझ्या मागल्या आणि ताककण्या चांगल्या ' ह्याप्रमाणे जर तुम्ही वागाल तर तुम्हाला कधीच उर्जितावस्था येणार नाही, मला मोठी शंका येते ती हीच की आज आपल्यात जागृती होत आहे ती क्षणिक ठरेल काय ? ज्या गुलामगिरीस नेस्तनाबूत करण्यास आज आपण सज्ज झालो आहो, तिचा पगडा तर तुमच्यावर पुन्हा बसणार नाही ना ? "

## चारित्र्य

**चारित्र्य ही मनुष्याची मोठी संपत्ती आहे. चारित्र्य संपन्न माणसे महान कार्य करतात. शिक्षणातून चारित्र्य संपन्न माणसे निर्माण करणे आवश्यक आहे.**

एकदा अस्पृश्य तरुणांची एक परिषद भरली होती. तरुणांची ध्येये भव्य असावीत. स्वतःच्या व देशाच्या उत्कर्षाचे त्याना वेड असावे. अखंड उद्योग आणि अध्ययनशीलता असावी. आपल्या ध्येय-ध्यासावर नजर ठेवून, ते गाठण्याच्या दिशेने सतत परिश्रम करावेत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी तरुणांना मिळणाऱ्या शिक्षणातून काम साध्य करावयाचे आहे. याविषयी बोलताना म्हटले आहे की, " शिक्षण हे दुधारी शस्त्र असल्यामुळे चालविण्यास धोक्याचे असते. चारित्र्यहीन आणि विनयहीन सुशिक्षित माणूस हा पशूपेक्षा भयंकर असतो. जर सुशिक्षित मनुष्याचे शिक्षण गरीब जनतेच्या हितास विरोधी असेल तर तो समाजाला शाप ठरतो. अशा सुशिक्षितांचा धिक्कार असो, शिक्षणापेक्षा चारित्र्य अधिक महत्वाचे. तरुणांची धर्मविरोधी प्रवृत्ती पाहून मला दुःख होते. काही लोक म्हणतात धर्म ही अफूची गोळी आहे, परंतु ते खरे नाही. माझ्या ठायी जे चांगले गुण वसत आहेत ते किंवा माझ्या शिक्षणामुळे समाजाचे जे काही हित झाले असेल, ते माझ्या ठायी असलेल्या धार्मिक भावनेमुळेच. मला धर्म हवा आहे. धर्माच्या नावाने चाललेला ढोंगीपणा नको."

३९८६ २४९२८ विविध २।२।८८ शाखा

## पद

**तुम्ही जे काम कराल त्या कामाबद्दल पद मागू नका. तुम्ही फक्त कामाचाच विचार करा. म्हणजे पद तुमच्या पाठोपाठ धावत येईल. तुम्ही काही चांगले केले आणि त्याचे फळ मिळाले नाही, असे सहसा घडत नाही.**

म. गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार पद्धतीत मूलतः अंतर आहे. बहुसंख्य समाजाबद्दलचा कळवळा डॉ. बाबासाहेबांच्या वाणीत आणि कृतीत दिसून येतो. बहुसंख्य समाजाचे जर काही मंगल घडवून आणावयाचे असेल तर त्यांचा नेताही त्यांच्याच समाजातील पाहिजे. आणि म्हणून एकादे मोठे पद कोणास मिळावे याबद्दलचा डॉ. बाबासाहेबांचा विचार मननीय वाटतो. ते म्हणतात, " गांधीची मोहिनी विद्या माझ्यावर छाप पाडू शकली नाही. जवाहरलाल नेहरु व सुभाष बोस गांधीना शरण गेले. परंतु मी गांधीना कधीही शरण जाणार नाही. आणि जर कधी काळी मी कॉंग्रेसमध्ये गेलो तर स्वतःच्या गुणवत्तेने तेथे सुद्धा छाप पाडीन. दहा महिने माझे खोती नष्ट करण्याचे विधेयक कॉंग्रेसने बुद्धया पाडून ठेवले आहे. पाठिंब्याच्या अभावी जर का ते विधेयक यशस्वी झाले नाही, तर शेतकऱ्यांनी करबंदीची चळवळ सुरू करावी. मी स्वतः त्या प्रश्नावर तुरूंगात जाण्यास तयार आहे. ऐंशी टक्के लोकसंख्या असलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुबापैकी एकाद्यास या प्रांताचे मुख्य प्रधान पद प्राप्त झाल्याचे दृश्य मला पहावयाचे आहे. "

**जेथ मनात कसल्याही प्रकारचे भय नसते, स्वार्थ नसतो व ढोंगीपणा नसतो तेथे धैर्य असते. निःस्वार्थ भाव मनात निर्माण झाला की कोणत्याही परिस्थितीला धैर्याने तोंड देता येते.**

डॉ. बाबासाहेब हे सर्व दलितांचे कैवारी होते. त्यांना साऱ्या दलितांचा उद्धार करावयाचा होता. त्यासाठी त्यानी सतीचे वाण पत्करलेले होते. अनेक प्रकारच्या मतमतांतरातून त्यानी सर्व दलितांना आपले मानून त्याना पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. हा महार, हा चांभार, हा रामोशी, आणि हा तेली असा संकुचित भेदभाव त्यांच्या मनात कधीच निर्माण झाला नाही. डॉ. बाबासाहेब चांभार समाजाच्या एका सभेत म्हणाले, " सर्व दलित समाजाच्या उद्धारासाठी मी कार्य सुरू केले आहे. मी विशिष्ट जातीवादी किंवा पंथवादी कल्पनेचा अथवा धोरणाचा माझ्या कार्यात कधीही अवलंब केला नाही. दलित समाजातील जातिभेदांचे उच्चाटन व्हावे ह्या मताचा मी आहे. त्या दृष्टीने मी कार्य करीत असतो. अस्पृश्यामधील जातीजातीत बेटी व्यवहार घडवून आणण्याचा प्रश्न हा काही जबरदस्तीने सोडविता येणार नाही. महार मुलीचे लग्न चांभार मुलाशी किंवा मांग मुलीशी जबरदस्तीने, जणू जादूची कांडी फिरविल्यासारखे, घडवून आणता येणे शक्य नाही. ज्या मुलांमुलीना असे धैर्य आहे त्यांना पाठिंबा देणे ते तसले धैर्य दाखविणाऱ्यांचे काम आहे."

## निष्ठा

**आपल्या जीवनातील आदर्शाबद्दल आपल्या मनात निष्ठा असली पाहिजे. पाण्याच्या एका थेंबासाठी अविचार धैर्याने ढगाकडे नजर लावून बसलेल्या चातकासारखी निष्ठा असली पाहिजे.**

सर्व दलित वर्गाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात अपार कळकळ होती. दलितांचा दुःखाला आपले दुःख समजून ते वागत होते. आणि म्हणून या देशातील दलित बांधवाविषयी डॉ. बाबासाहेब म्हणतात की, " मी एका अशा काही निष्ठेला बांधला गेलो आहे की, तिला मी कधीही अंतर देऊ शकत नाही. ती निष्ठा म्हणजे माझा अस्पृश्य वर्ग. त्यांच्यात मी जन्मास आलो. मी त्यांचा आहे. जिवात जीव असेपर्यंत मी त्यांना अंतर देणार नाही. यास्तव या विधिमंडळाला मी दृढ निश्चयपूर्वक सांगतो की, जेव्हा अस्पृश्यांचे हित व देशाचे हित यामध्ये संघर्ष निर्माण होईल त्यावेळी माझ्यापुरते मी सांगतो की, अस्पृश्यांच्या हितालाच मी प्राधान्य देईन. जी छळ करणारी बहुसंख्याक जमात आहे. ती देशाच्या नावाने बोलत असली तरी तिला मी पाठिंबा देणार नाही. ही माझी भूमिका प्रत्येकाने नि प्रत्येक ठिकाणी समजून घ्यावी. देशाचे हित आधी की माझे हित आधी असा प्रश्न उद्‌भवला तर मी आधी देशाचेच हित पाहीन. तसेच माझ्या समाजाचे हित आधी की देशाचे हित आधी असा जेव्हा प्रश्न उपस्थित होईल, तेव्हा मी अस्पृश्य वर्गाच्या हिताच्याच बाजूने उभा राहीन."

## इतिहास

---

**इतिहास घडविणारी माणसे थोर असतात. त्यांना पुढील शंभर वर्षात काय घडणार आहे, हे माहित असते. कारण पाठीमागे पाहून ही माणसे पुढे चालत असतात.**

---

फेब्रुवारी १९४२ च्या मध्यावर मुंबई येथे वसंत व्याख्यान माला आयोजित करण्यात आली होती. व्याख्यान मालेच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'पाकिस्तानविषयी विचार' या इंग्रजी ग्रंथावर तीन दिवस उद्‌बोधक चर्चा झाली. व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी आचार्य दोंदे होते. शेवटी चर्चेला उत्तर देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "ज्याना पाकिस्तान हा चर्चेचा विषय आहे असे वाटत नाही, त्यांच्याशी वाद घालण्यात अर्थ नाही त्यांना जर पाकिस्तान निर्मिती ही अन्यायाची वाटत असेल तर होऊ घातलेले पाकिस्तान ही त्याना अत्यंत भयंकर अशी गोष्ट वाटेल. इतिहास विसरा असे लोकांना सांगणे चूक आहे. जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकणार नाहीत. भारतीय सैन्यातील मुसलमानांचे वर्चस्व कमी करून ते सैन्य एकजीव आणि निष्ठावंत करणे ही गोष्ट शहाणपणाची आहे. आपल्या मायभूमीचे संरक्षण आम्ही करूच करू! पाकिस्तान मिळाले तर मुसलमान सर्व हिंदुस्तानावर आपले साम्राज्य पसरवतील असा खोटा समज करून घेऊ नका. हिंदू त्यांना धुळीस मिळवतील. स्पृश्य हिंदूशी काही मुद्यावर माझे भांडण आहे, हे मी मान्य करतो. परंतु तुमच्यासमोर अशी प्रतिज्ञा करतो की, आमच्या देशाचे स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठी मी आपला प्राण अर्पण करीन."

## कर्तव्य

---

**आपण अयशस्वी झालात म्हणून दुःखी होऊ नका. कारण ती एक स्वाभाविक गोष्ट आहे. संघर्षाशिवाय जीवनाला काय अर्थ आहे ? आणि म्हणून सतत कर्तव्य करत रहा**

---

एक स्त्री शिकली तर सारे कुटुंब सुशिक्षित होते, स्त्रियांनी शिक्षण घेऊन आपला संसार सुखाचा करावा. दलित स्त्री वर्गाच्या एका परिषदेत बोलताना डॉ. आंबेडकर म्हणत होते की, "स्त्रियांना आपल्या कर्तव्याची महती समजली म्हणजे त्या समाज सुधारणे-साठी कार्य करू शकतील याची मला कल्पना आहे, समाजातील घातुक चालीरीतींचे उच्चाटन करून तुम्ही मोठी सेवा केली आहे. तुमच्या प्रगतीविषयी मला समाधान वाटते. तुम्ही स्वच्छ राहावयास शिका. दुर्गुणापासून दूर रहा. मुलांना शिक्षण द्या. त्यांच्या मनामध्ये महत्वाकांक्षा जागृत करा तुम्ही जगात मोठेपणा मिळवू शकाल असे विचार त्यांच्या मनावर बिंबवा, त्यांच्या मनातून न्यूनत्वाची भावना काढून टाका. लग्न करण्यात घाई करू नका, लग्न ही एक जबाबदारी असू शकते. लग्न करतील त्यानी हे लक्षात ठेवावे की, अनेक मुले जन्माला घालणे हे एक पाप आहे. आपल्यापेक्षा जीवनात वरच्या पातळीवर प्रत्येक मुलाला आरंभ करून देणे हे आईबापांचे कर्तव्य आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक मुलीने लग्ना-नंतर नवऱ्याशी निष्ठेने राहिले पाहिजे."

**इतरांचा द्वेष करून आपल्याबद्दल इतरांच्या मनात प्रेम वाढत नाही. परंतु ज्यांच्यासंबंधी आपल्या मनात प्रेम असते, त्यांच्यासंबंधी कोणी द्वेष करू लागला तर ते आपणास सहन होत नाही.**

एकाद्या व्यक्तीविषयी आदर असणे ही गोष्ट वेगळी व ती व्यक्ती सांगेल त्याप्रमाणे वागणे ही गोष्ट वेगळी. एकाद्या व्यक्तीविषयीच्या द्वेषाने द्वेष वाढत जातो. द्वेषाचे निर्मुलन द्वेषाने होत नाही. आणि म्हणून द्वेष ही एक शक्ती आहे असे पटवून देताना डॉ. बाबासाहेब म्हणतात की, जो कोणी आपल्या कालखंडावर आपल्या व्यक्तीमत्वाचा ठसा उमटवायची ईर्षा बाळगतो आणि महान तत्वाना निज्वलंत प्रश्नांना जे सहाय्य देणे शक्य आहे आणि ते देण्यासाठी झगडतो, त्याच्या रागाला नि द्वेषाला धार असली पाहिजे. नाहीतर ते कार्य त्याच्या हातून होणार नाही. मी अन्याय, पिळवणूक, बढाई आणि भोंदुगिरी यांचा द्वेष करतो. ज्यांच्या अंगी हे दुर्गुण आहेत ते मला तिरस्कार्ह वाटतात. माझ्या टीकाकारांना मला सांगावयाचे आहे की,माझ्यात वसत असलेला द्वेष ही एक शक्ती आहे असे मी मानतो, कारण ज्या प्रश्नासंबंधी मला प्रेम वाटते, ज्याच्यावर माझा विश्वास आहे आणि ज्यांच्याबद्दल मला कसलीच खंत वाटत नाही, त्यांची ही दुसरी बाजू आहे. ”

**सत्य हे अखेर सत्यच असते. ते वेदातील असो नाहीतर पुराणातील असो. सत्यास दुसरा पर्याय असत नाही. ते कितीही कटू असले तरी स्वीकारावेच लागते.**

मद्रासच्या ' बुद्धिवादी समाजा 'च्या वतीने डॉ. बाबासाहेबांचे एक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानात भारतीय जीवनाचा आढावा घेत घेत ते सत्य शोधणाचा मागोवा घेत म्हणाले की, " प्राचीन भारतीयांचे जेवढे समृद्ध आणि गतिमान राजकीय जीवन होते तेवढे दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या प्राचीन काळात तसे जीवन नव्हते. त्याकाळी हिंदुस्थान हा क्रांतीचा देश होता. त्या क्रांतीच्या पुढे फ्रेंच राज्यक्रांती सुध्दा शूद्र ठरावी. त्यासंबंधी विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की, बौध्द धर्म नि ब्राह्मण धर्म ह्यात मोठा झगडा होऊन ब्राह्मण धर्माने बौध्द धर्माच्या विरूध्द प्रतिक्रांतीचा लढा सुरू केला वादाचे मूळ एकच होते. ते म्हणजे सत्य म्हणजे काय ? बुध्द म्हणे सत्य म्हणजे दशेंद्रियानी जे काही सिध्द करता येते ते. ब्राह्मणांच्या मते सत्य म्हणजे जे काही वेदानी सांगितले ते. आपण प्रतिक्रांतीकारकांच्या पकडीत सापडलो आहोत. जर आपण यातून त्वरीत सुटका करण्याकरिता काही केले नाही तर या देशावर मोठे संकट आल्याशिवाय राहणार नाही. "

## कल्याण

**दुसऱ्याचे कल्याण करणे हा एक थोर विचार आहे. परंतु यासाठी आपल्या सुखापेक्षा इतरांचे सुख महत्त्वाचे आहे, हा विचार ध्यानात ठेवावा लागतो.**

मुंबईच्या सचिवालयात एकदा विभागीय कामगार प्रशासकांची परिषद भरली होती. त्यावेळी औद्योगिक अशांतता टाळण्यासाठी काय काय करता येईल या गोष्टीवर भर देण्यात आला. औद्योगिक शांतता प्रस्थापित करण्याच्या विषयी बोलताना डॉ. बाबासाहेब म्हणाले की, "ह्यामुळे सत्तेच्या बळावर औद्योगिक शांतता प्रस्थापित करता येणे शक्य नाही. कायद्याच्या बळावर ती शक्य आहे. परंतु खात्री देता येत नाही. ती सामाजिक न्यायनीतीच्या बळावर करता येणे शक्य आहे. ही सूचना आशादायक वाटते. त्यात तीन बाजू गुंतलेल्या आहेत. पहिली म्हणजे स्वतः कामगारानीच आपले काम करण्याचे कर्तव्य ओळखले पाहिजे. म्हणजे त्यांनी कामचुकारवृत्ती टाकून दिली पाहिजे. मालकाने योग्य वेतन देणे ह्याचेच नाव पिळवणूक थांबविणे आणि त्यांना काम करण्यास सुखावह परिस्थिती निर्माण करणे. याचेच नाव कामगार कल्याण होय. तिसरी गोष्ट म्हणजे सरकार नि समाज ह्यानी औद्योगिक संबंध सलोख्याचे राहावे ह्यासाठी जपले पाहिजे. हे सार्वजनिक काम आहे. ते मालक आणि कामगार ह्यामधील केवळ करार नाही."

**मनुष्याने कृतज्ञ राहावे. परंतु आपल्या स्वातंत्र्याचा किंवा शीलाचा बळी जात असेल, तर कोणीही कृतज्ञ राहू शकणार नाही.**

लोकशाही स्वातंत्र्याचे एक गमक आहे. एखादा माणूस कितीही थोर असला तरी त्याच्या चरणावर आपले स्वातंत्र्य अर्पण करू नये किंवा आपल्या संस्थेचा नाश करण्यास तो समर्थ होईल एवढी सत्ताही त्याच्या स्वाधीन करू नये. ह्या विचाराचे समर्थन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, " ज्या थोर लोकांनी आयुष्यभर राष्ट्राची सेवा केली, त्यांच्याविषयी कृतज्ञता बाळगण्यात काही गैर नाही. परंतु त्या कृतज्ञतेस काही मर्यादा असते. आपल्या आत्म प्रतिष्ठेचा बळी देऊन कोणीही मनुष्य कृतज्ञ राहू शकत नाही. आणि आपल्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कुठलेही राष्ट्र कृतज्ञ राहू शकत नाही. दुसऱ्या कोणत्याही देशापेक्षा भारतात ही सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. कारण भारतामध्ये राजकारणात विभूती पूजेचा इतका जबरदस्त परिणाम होतो की, तसा परिणाम जगातील कोणत्याही दुसऱ्या देशाच्या राजकारणात होत नाही धर्मामध्ये भक्ती ही आत्म्याला मुक्ती मिळविण्याचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती अथवा विभूतिपूजा हा अधोगतीचा आणि अंती हुकूमशाहीचा निश्चित मार्ग आहे म्हणून समजावे. "

## अभाव

**कोणत्याही गोष्टीत काही अभाव असेल तर त्यामुळे ती सर्वांना हितकारक होऊ शकत नाही. अभावाची पूर्ती ही त्या गोष्टीतील सर्वगुणसंपन्नताच होय.**

आपल्या देशात जर लोकशाही तत्वावर कारभार करावयाचा असेल तर लोकशाहीची प्राणभूत तत्त्वे आपण आचारात आणली पाहिजेत. लोकशाहीच्या जोपासनेविषयी बोलताना डॉ बाबासाहेब म्हणतात की, " भारतीय लोकशाहीचे सरक्षण करताना भारतीयांना तिसरी गोष्ट केली पाहिजे ती ही की, त्यांनी राजकीय लोकशाहीमुळे संतुष्ट राहू नये. राजकीय लोकशाहीचे त्यानी सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीत रुपांतर केले पाहिजे. राजकीय लोकशाही ही जर सामाजिक लोकशाहीवर अधिष्ठित केली नाही तर ती टिकूच शकणार नाही. कारण सामाजिक लोकशाही,स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही जीवनाची तत्त्वे म्हणून ओळखते.स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही एक अखंड आणि अभंग अशी त्रिमूर्ती आहे. जर सामाजिक समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मूठभर लोकांचे जनतेवर राज्य असणे असा होईल. जर समता ही स्वातंत्र्यशून्य असेल, तर ती व्यक्तीच्या जीवनातील स्वयंप्रेरणा नष्ट करील. जर बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य आणि समता यांची वाढ साहजिकपणे होणार नाही. हिंदी जनतेने एक गोष्ट मान्य केली पाहिजे, ती ही की हिंदी समाजात दोन गोष्टींचा अभाव आहे. त्या दोन गोष्टी म्हणजे सामाजिक समता आणि आर्थिक समता या होत. "

## नीती

**कोणत्याही धर्माचे महत्व तर्कनिष्ठतेमध्ये नसून नीतीमध्ये असते. नीतीविषयी बोलणारे लोक कधी कधी धर्मावर आवरण घालत असतात. धर्म हा एक आंतरिक अनुभव आहे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कल बौध्दधर्म स्वीकारण्याकडे होऊ लागला. कारण त्यांना असे वाटू लागले की बौध्द धर्माची तत्वे टिकाऊ असून ती समानतेवर आधारलेली आहेत. एकदा बुध्दजयंतीच्यावेळी डॉ. बाबासाहेब बोलत होते की, " बौध्दधर्म नीतीवर अधिष्ठित आहे. तसेच बुध्द हा मार्गदाता आहे. उलटपक्षी श्रीकृष्ण म्हणतो मी देवांचा देव आहे, खिस्ताने सांगितले, मी देवाचा पुत्र आहे, तर महंमद पैगंबराने सांगितले, मी देवाचा प्रेषित आहे. बुध्दाखेरीज सर्व धर्मसंस्थापकांनी आपण मोक्षदाते आहोत ही भूमिका घेतली आणि स्वतः स्खलनातीत आहोत अशी ग्वाही दिली. उलट-पक्षी, बुध्दाने आपल्याकडे मार्गदर्शकाची भूमिका पत्करली. बुध्दाचा धर्म म्हणजे नीती ! बौध्द धर्मात देवाची जागा नीतीने घेतली आहे. धर्म या शद्बाचा क्रांतिकारक अर्थ बुध्दाने विचारार्थी मांडला. ब्राम्हणांच्या मताप्रमाणे धर्म म्हणजे यज्ञ आणि देवाला दिलेली आहुती कर्माच्या ऐवजी बुध्दाने धर्माचे नवनीत म्हणून नीतीच मानले. हिंदु-धर्माचे सामाजिक तत्व समता आहे, तर बौध्द धर्म हा समतेसाठी उभा आहे "

**आपल्याजवळ जें आहे. ते दुसऱ्यास देण्यामध्यें आनंद असतो. अर्थ असो किंवा धर्म असो त्यातील उदात्त रुप समाजाच्या हिताचे असते.**

धर्माच्या नावावर अनेक ठिकाणी ढोंगीपणा चाललेला असतो. गरीबांच्या सेवेत रममाण होणारा धर्म हा खरा-खुरा मानव धर्म होय. सर्व श्रेष्ठ साधुसंतानी याच धर्माचा पुरस्कार केला. परळ येथे भरलेल्या अखिल भारतीय साईभक्त मेळाव्यासमोर बोलताना डॉ. आंबेडकरांनी मानवधर्माच्या उदात्त विचारावर प्रकाश टाकताना म्हटले आहे की, " आज आपल्या सर्व लोकांच्या धर्मात देवही नाही आणि नीतीही नाही. मनुष्याच्या मनाची ही अवनतदशा आहे. धर्मास पुन्हा शुद्ध व उदात्त स्थिती प्राप्त करून देणे हे भावी पिढ्यांचे काम आहे. आजच्या काळात हिंदुस्थानात धर्म असा राहिलेला नाही. ती केवळ मूर्तीची पूजा आहे. मग त्या मूर्ती साधु-संत किंवा जादूगार यांच्याही असतील. धर्माच्या प्रथमावस्थेत धर्म ही मनुष्याच्या वैयक्तिक आत्मोन्नतीची बाब होती. दुसऱ्या अवस्थेत मनुष्यमात्रानी एकमेकांशी कसे वर्तन ठेवावे यासंबंधी नियंत्रण ठेवणाऱ्या नियमावर अधिष्ठित असणाऱ्या बधुभावाचा परिपोष करणे हे धर्माचे उद्दिष्ट होते. धर्माच्या तिसऱ्या अवस्थेत, ज्या व्यक्ती आपल्या जीवनाच्या गरजा पुरवितात त्यांची पूजा करणे हा धर्माचा अर्थ होऊ लागला. संताच्या नावाने गोळा केलेल्या निधीचा विनियोग रुग्णालये, शिक्षण, गोरगरीब व विधवा यांच्या चरितार्थासाठी, छोट्या उद्योगधंद्याच्या स्थापनेसाठी खर्च करण्यात यावा. "

**प्रत्येक मनुष्याचे जगण्याचे एक तत्त्वज्ञान. आपले जीवन जगण्याच्या तत्त्वांची आपणच एक फुटपट्टी तयार करतो. अशा तत्त्वज्ञानास बहुतांची अंतरे आनंदित ठेवण्याचा ध्यास असावा.**

तीन ऑक्टोबर १९५४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आकाशवाणीवर ' माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान ' या मालिकेत भाषण झाले. त्यात ते म्हणाले, " प्रत्येक मनुष्यास जीवनाचे तत्त्वज्ञान असले पाहिजे. कारण आपली वर्तणूक मोजण्यास प्रत्येकाजवळ कोणती तरी मापकाळी असावयास हवी. तत्त्वज्ञान म्हणजे दुसरे काही नसून ज्याने आपले जीवन मोजायचे ती मापकाठीच होय. भगवद्‌गीतेतील नकारात्मक हिंदू सामाजिक तत्त्वज्ञान मी झिडकारतो. ते तत्त्वज्ञान शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानातील त्रिगुणावर अधिष्ठित आहे. आणि शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान तर कपिलमुनींच्या तत्त्वज्ञानाचा धडधडीत विपर्यास आहे.शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानामुळे जातिसंस्था नि असमानतेची उतरंड ही हिंदूच्या सामाजिक जीवनाचा निर्बंध बनली आहे, माझे सामाजिक तत्त्वज्ञान हे निश्चितपणे तीन शब्दात गुंफले जाण्याचा संभव आहे. हे शब्द म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुभाव. तथापि हे माझे तत्त्वज्ञान फ्रेंच राज्यक्रांतीपासून मी उसने घेतले आहे असे कोणीही समजू नये. मी ते उसने घेतलेले नाही. माझ्या तत्त्वज्ञानाची मुळे धर्मात आहेत. राज्यशास्त्रात नाहीत. माझा गुरु बुध्द याच्या शिकवणीपासून ते मी काढले आहे."

## लोकशाही

---

**लोकांची, लोकासाठी आणि लोकामार्फत चालू असलेले राज्यपद्धती म्हणजे लोकशाही होय. लोकशाहीच्या रक्षणात शिक्षण आणि समंजसपणा यास अधिक स्थान आहे.**

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार म्हणून प्रसिध्द आहेत. भारतासारख्या देशात लोकशाही प्रकाराची राज्यपध्दती त्यांना योग्य वाटते. तथापि या लोकशाहीच्या रक्षणार्थ आपण काय केले पाहिजे याविषयी बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले, " लोकशाही म्हणजे प्रजासत्ताक किंवा संसदीय सरकार नव्हे. लोकशाहीची मुळे सरकारी पध्दतीत, संसदीय किंवा दुसऱ्या कोणत्याही पध्दतीत नसतात. लोकशाही म्हणजे सहजीवनाने राहण्याची एक पध्दती. लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधात शोधावयाची असतात. जे लोक तो समाज बनवतात त्यांच्या सहजीवनाच्या संदर्भात तिची मुळे शोधावयाची असतात. हिंदी समाज व जातिभेदावर अधिष्ठित आहे भारतीय समाजाच्या खालच्या थरातील लोकांना जातिव्यवस्था मोडावयाची आहे. खालच्या थराला जर तुम्ही शिक्षण दिलेत तर ही जातिव्यवस्था मोडून पडेल. आजकाल भारतीय सरकार शिष्यवृत्त्या देऊन शिक्षणाला जी भरमसाट मदत करीत आहे ते शिक्षण जातिव्यवस्था बळकट करणार आहे. ज्यांना जातिव्यवस्था मोडावयाची आहे त्यांना शिक्षण दिले तर भारतात लोकशाहीचे भवितव्य उजळेल आणि लोकशाही सुरक्षित राहील.

## दु:ख

---

**आपण सुखासाठी धडपडत असताना ज्या ज्या गोष्टींचा संग्रह करतो तेच खरे दुःखाचे मूळ होय. अशा दुःखाची जाणीव झाल्यानंतर खऱ्या सुखाचा अर्थ कळतो.**

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धर्म स्वीकारला. बौध्द धर्म हा जगातील सर्वात मोठा धर्म आहे. कारण तो केवळ धर्म नसून तो एक महान सामाजिक सिध्दांत आहे. पाच लाख लोका-सहित डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर केले. २० नोव्हेंबर १९५६ रोजी त्यांनी बुध्द आणि कार्लमार्क्स या विषयावर व्याख्यान देताना म्हटले, " बुध्द आणि मार्क्स यांचे ध्येय एकच होते मार्क्सच्या मते खाजगी मालमत्ता हीच दुःखाच्या मुळाशी आहे. त्याची परिणती पिळवणूक, दुःख नि गुलामगिरी यात होते. बुध्दाला सुध्दा दुःख नाहीसे करावयाचे होते. दुःख या शब्दाचा अर्थ बौध्द वाङ्मयात खाजगी मालमत्ता असा केलेला आहे बुध्दाचे म्हणणे असे की, सर्व-काही नाशवंत आहे. म्हणून मालमत्तेसाठी झगडण्याची आवश्यकता नाही. बौध्द भिक्षूना खाजगी मालमत्ता ठेवायची अनुज्ञा नव्हती बुध्दाने आपल्या धर्माचा पाया देव वा आत्मा यावर उभारलेला नाही म्हणून खाजगी मालमत्ता नाकारण्याचे तत्व सर्व समाजाला लाव-ण्याच्या मार्गात बौध्द धर्म अडथळा करणार नाही. तथापि, बौध्दधर्म नि साम्यवाद यांचे आपापले उद्दिष्ट साधण्याचे मार्ग भिन्न आहेत. खाजगी मालमत्तेचे निर्मूलन करण्याचा साम्यवादाचा मार्ग अत्याचारी आहे. खाजगी मालमत्तेचे उच्चाटन करण्याचा बौध्द धर्माचा मार्ग हा अनत्याचारी आहे. मनुष्याच्या मनाची नि जगाच्या मनाची सुधारणा झाल्याशिवाय जगाची सुधारणा होणार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3980
निबंध 284225
21286
(स्थळ प्रत)

# आमची बाल व प्रौढ वाचकांसाठी

## श्री. रा. तु. भगत लिखित अत्यंत वाचनीय पुस्तके

- अमृतवाणी ( गाडगेबाबांच्या किर्तनातील बोधामृत ) किंमत रु. ११
- भीमवाणी ( डॉ. आंबेडकरांच्या वक्तव्यातील विचारामृत ) किंमत रु. ८
- विवेकवाणी ( विवेकानंदाच्या जीवनातील मौलिक अनुभव ) किंमत रु. १२
- वदले शाहू छत्रपती ( राजर्षी शाहूंच्या जीवन कार्याचे विचारधन ) किंमत रु. ५
- असे होते गाडगेबाबा ( गाडगेबाबांच्या जीवन–कार्याचे विचारधन ) किंमत रु. ५

## - आमची महत्वाची शैक्षणिक प्रकाशने -

- स्त्री शिक्षणाचे शिल्पकार किंमत रु. १०
  ( स्त्री शिक्षणविषयक चौदा शिक्षणतज्ञाचे समग्र विचार व कार्य )
- आजच्या शिक्षणातील विचारप्रवाह किंमत रु. १५
  (आजच्या शिक्षणविषयक समस्यांवर प्रकाशझोत टाकणारे शिक्षणतज्ञांचे लेख)
- राजर्षी शाहू : शिक्षणविषयक विचार आणि कार्य किंमत रु. १७-५०
- नवभारत : शिक्षण व शिक्षक ले. प्रा. भगत, प्रा. डांगे, प्रा. लाटकर. किंमत रु. २२
  ( नवभारताच्या जडणघडणीसाठी अपेक्षित शिक्षण व शिक्षकाची भूमिका )

### – काव्यसंग्रह –

- बुडालेला किनारा किंमत रु. १०
  ( प्रेम, सौंदर्य व निसर्गाच्या अनेकविध अविष्काराने नटलेला व त्याच प्रमाणे श्री. ना. धों. महानोर यांचे 'दोन शब्द' आणि श्री. जगदीश खेबुडकरांचा वाचनीय अभिप्राय लाभलेला श्री. राजा मिसर यांचा उत्कृष्ट काव्य–संग्रह )
- निभा किंमत रु. ४
  ( अनेक नवोदित कवींच्या उत्कट काव्यप्रतिमा. श्री. वि. म. कुलकर्णींच्या वाचनीय स्वागतपर प्रस्तावनेसह. ) संपादक : श्री. संजय भगत

---

चैतन्य प्रकाशन 'लक्ष्मी निवास' २०३२ 'ए' वॉर्ड, धोत्री गल्ली
कोल्हापूर–४१६ ००२ फोन नं. २९६२५

---

कव्हर : ललित, कोल्हापूर.

REFBK-0024828